# प्रसिध्दीपत्र

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे - ०४ यांचे मार्फत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा डिसेंबर - २०२४ मधील टंकलेखन विषयाची दि. १४ डिसेंबर २०२४ ते दि. १५ डिसेंबर २०२४ या कालावधीत महाराष्ट्र राज्यातून १८ केंद्रांवर घेण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यातून विद्यार्थी संख्या कमी असल्याने सदर परीक्षेसाठी ठरावीक जिल्हयांमध्येच परीक्षा केंद्र घेण्यात आलेली आहेत. तरी प्रवेशपत्रे प्रसिध्द झाल्यानंतर परीक्षा केंद्र बदलाबाबत व बॅच बदलाबाबत कोणताही ई-मेल अथवा पत्र या कार्यालयास पाठवू नयेत. केंद्रबदल व बॅच बदल यामध्ये कोणताही बदल करुन दिला जाणार नाही, याची सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी.

तसेच सदर परीक्षेसाठी जाणीवपूर्वक बंद पडलेल्या टंकलेखन मशीन्स केंद्रांवर ठेवण्यात आल्या असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित संस्थाचालकाविरुध्द कारवाई करण्यात येईल, याची देखील नोंद संबंधित सर्व संस्थाचालकांनी घ्यावी.

सदर परीक्षेची प्रवेशपत्रे परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगिनव्दारे दि. ०५/१२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

संबंधित टंकलेखन संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करून **त्यावर विद्यार्थ्यांचा अद्ययावत फोटो चिकटवून त्यावर संस्थेचा शिक्का व स्वाक्षरीसह** संबंधित परीक्षार्थ्यांना त्वरीत वितरीत करण्याची व्यवस्था करावी.

सर्व परीक्षार्थ्यांनी त्यांची ऑनलाईन प्रवेशपत्रे आपल्या टंकलेखन संस्थेतून परीक्षेपूर्वी हस्तगत करावे.

**टिप : सर्व परीक्षार्थिनी परीक्षेच्या वेळी मूळ प्रवेशपत्र व मूळ फोटो ओळखपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे.**

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे -०४**

**दिनांक :- ०५/१२/२०२४**
**स्थळ :- पुणे**